**प्रेसनोट** दि. ३१/०७/२०२३

वैद्यमापन शास्त्र पुणे विभाग, पुणे येथील सहनियंत्रक वैद्यमापन यांचेवर
लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५४ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | डॉ. श्री. ललित बेनीराम हारोळे, वय ५५ वर्ष, सह नियंत्रक, वैद्यमापन शास्त्र पुणे विभाग, पुणे. (वर्ग-१) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३१,०००/- रुपये (एकतीस हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३१,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | ३१/०७/२०२३ |
| सापळा दिनांक | ३१//०७/२०२३ |

ठिकाण :- वैद्यमापन शास्त्र पुणे विभाग, येरवडा, पुणे कार्यालयात.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे निरीक्षक, वैद्यमापक शास्त्र, इस्लामपुर येथे नेमणुकीस असून, त्यांचेकडे इस्लामपुर विभाग तसेच कराड - १, कराड - २ व सातारा – २ अशा तीन विभागाचा अतिरिक्त कार्यभार आहे. लोकसेवक डॉ. श्री. ललित हारोळे हे त्यांचे विभागीय प्रमुख असून, तक्रारदार यांच्या विभागाचे हद्दीत होणारी पडताळणी व मुद्रांकनच्या बद्दल प्रत्येक निरीक्षक विभागाप्रमाणे दरमहा ४,०००/- रुपये हप्ता मागणी करुन एकुण १६,०००/- ची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक डॉ. ललित हारोळे, सह नियंत्रक यांनी तक्रारदार यांचे हद्दीत होणारे पडताळणी व मुद्रांकनच्या बद्दल तक्रारदाराकडे असलेल्या ०४ निरीक्षक विभागाचे दरमहा हप्ता ४,०००/- रुपये प्रमाणे एकुण १६,०००/- रुपये व कराड-१ विभागाचे कार्यक्षेत्रातील डायमंड शुगर वर्क कंपनीचे स्टोर कॅलीब्रेशनचे तीन टॅकसाठी प्रत्येकी ५,०००/- रुपये प्रमाणे १५,०००/- रुपये असे एकुण ३१,०००/- रुपयांची लाच मागणी करून, ती रक्कम येरवडा येथील वैद्यमापन शास्त्र पुणे विभाग, पुणे कार्यालयात लोकसेवक श्री. ललित हारोळे यांनी त्यांचे कक्षात स्विकारल्यावर त्याना रंगेहाथ पकडण्यात आले असून, येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक सुदाम पाचोरकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.